



# पारनेर दर्शन






वर्ष १ अंक २५५, गुरुवार २७ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# खा. लंकेंनी इंग्रजीचे आव्हान पेलावले आता विखेंनी पडताळणीचे प्रतिआव्हन स्विकारावे

## सारीपाट मांडलाच तर घोडे, उंट, प्यादे पळवायचे की अन्य चतुस्पाद

**दक्षिण नगर लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार नीलेश लंके यांनी इंग्रजीत शपथ घेऊन मा. खा. डॉ. सुजय विखे यांचे आव्हान पेलावले, आता या राजकीय सारीपाटावर प्यादे पुढे सरकवून प्रतिआव्हान स्विकारण्याची बारी मा. खा. विखे यांची आहे.**






लंकेंनी इंग्रजीत भाषण केले तर मी उमेदवारी अर्जच भरणार नाही असे थेट आव्हान दस्तुरखुद्द डॉ. सुजय विखे यांनी जाहिररित्या दिले होते. ही बाब सर्वश्रुत आहे. ते आव्हानच खा. लंके यांनी संसदेत इंग्रजीत शपथ घेऊन पूर्ण केले. पण मा. खा. विखे यांनी उमेदवारी अर्ज भरला निवडणूक लढविली आणि पराभूतही झाले. एव्हढेच नव्हे तर पराभूत होऊनही निवडणूक आयोगाकडे मतपडताळणीसाठी अर्ज केला. आता तरीही विखे यांनी खिलाडूवृत्ती दाखवून पडताळणीचा अर्ज मागे घेऊन खा. लंके यांची निवड स्वीकारण्याचे धाडस दाखवावे असे लंके समर्थकांचे आव्हान स्विकारावे. राजकीय सारीपाटावरील सतरंजावरील घोडे, उंट प्यादी कधीच बाद झालीत आता जे या खेळाच्या रिंगणात नसलेले अन्य चतुस्पाद पुढे करू नयेत. त्या बिगर खेळातील प्राण्याची नावे घेण्यात काहीच हशील नाही. ते केवळ ओझी वाहणारी भाडोत्री असतात ते पॅकेज आता तरी वाय घालू नये.

पवार साहेबांनी संसदेत मातृभाषेत बोलता येते हे निर्देशित करताना आमचा हा गडी काय करेल हे सांगता येणार नाही. अशी पुष्टी जोडली होती. खा. लंके यांनी इंग्रजीतून शपथ घेऊन प्रमाणित केलेच. खा. लंके यांना इंग्रजी येत नाही ही टीका त्यांनी फिजूल ठरविली. वास्तविक इंग्रजी अनिवार्य नाही हे माजी खा. डॉ. सुजय विखे यांनी लक्षात घेऊन वास्तविक घुमजाव करायला हवे होते. त्यासाठी त्यांच्या घरातच उदाहरण होते. मा. खा. बाळासाहेब विखे आठ वेळा खासदार झाले. सुरूवातीला त्यांना इंग्रजी येत नव्हते. त्यांनी पुढे ते शिकून घेतले. त्यांच्यापूर्वी जे.बोगावत, र.के. खाडीलकर, अनंतराव पाटील, ॲड अप्पासाहेब शिंदे जे खासदार होते. त्यांच्याप्रमाणेच खा. बाळासाहेब विखे यांनाही इंग्रजी येत नव्हते. ही वस्तूस्थिती किमान लक्षात घ्यायाला हवी होती. दक्षिणेचे खा. दादापाटील शेळके यांची तर इंग्रजीची तोंड ओळखही होती की नाही याचे उत्तर शोधावे लागेल. तुकाराम गडाख खासदार होते पण ते किती वेळा संसदेत इंग्रजीतून बोलले ? एवढेच कशाला भाजपाचेच दिलीप गांधी खासदार आणि केंद्रात मंत्री होते तरी त्यांना कितपत इंग्रजी येत होते त्यांचे शिक्षण घेता त्यांच्याकडून इंग्रजी अपेक्षीतच नव्हते. मग मा. खा. डॉ. सुजय विखे हे खा. लंकेंकडून इंग्रजीची अपेक्षा का करत होते हे त्यांचे राजकीय अज्ञान की राजकीय हुषारी याचे उत्तर अनुत्तरीतच राहते. आपले अज्ञात उघड केल्यावर किती फजिती होते याचे हे मुर्तीमंत उदाहरण ठरणार आहे. हे हास्य ते टाळू शकणार नाहीत.

### लंके चक्रव्यूहातून बाहेर, विखे यांचा अभिमन्यू !

**नवनिर्वाचित खा. नीलेश लंके हे मा. खा. विखे यांच्या राजकीय चक्रव्युहातून सहीसलामत बाहेर आले असून विखे यांचा अभिमन्यू झाला या शतरंजाच्या खेळातील सारीपटावरील प्यादी गारद झाली आहेत. त्यमुळे अशी बिनभरोशाची प्यादी वापरू नयेत. अन्यथा राजकीय खेळी अंगलट येण्याचा धोका संभवतो.**

### विषय प्रसिध्दीचा नाही, राजकीय इभ्रतीचा

महाराष्ट्रातील अन्य नवनिर्वाचित खासदारांनी मराठीत शपथ घेतली. मात्र त्याला नीलेश लंके अपवाद ठरले. त्यांनी चक्क असख्खलीत इंग्रजीत शपथ घेतली. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यासह देशभरातील सर्वपक्षीय खासदारांनी खा. लंके यांचे कौतुक केले. संसदेतील पहिल्यांदाच शपथ घेताना त्यांनी देशवासीयांचे लक्ष वेधून घेतले. त्यामुळे लंके यांच्याबरोबरच विखेंच्या नावाची आवर्जुन चर्चा झाली. कारण ते आव्हान विखेंचे होते. ही फुकटच प्रसिध्दी उभयतांची झाली हा विषय तसा प्रसिध्दीचा नसून राजकीय इभ्रतीचा सुध्दा आहेच हे आवर्जुन लक्षात घ्यावे.

### लंके यांनी जायंट किलर उपाधी सिध्द केली

नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात इंग्रजी हाच प्रचाराचा प्रमुख मुद्यांपैकी एक झाला होता. उभय बाजूंनी त्यावर उलट-सुलट चर्चा झडली होतीच. थेट राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी भाष्य करून संसदेत इंग्रजी, हिंदी अनिवार्य नाही. मातृभाषेतही बोलता येते असे सांगत विखेंना घेरले होते. निवडणूकीनंतर राष्ट्रवादीच्या रौप्यमहोत्सवी मेळाव्यातही पवार साहेबांनी हा विषय आवर्जुन छेडला होता. यावरून हा मुद्दा किती प्रतिष्ठेचा झाला होता हे निर्देशित होते. म्हणून महाराष्ट्रातील अन्य नवनिर्वाचित खासदारांनी मराठीतून शपथ घेतली असताना खा. लंके यांनी मुद्दामहून इंग्रजीत शपथ घेऊन आव्हान तर पेलवलेच पण हा विषय ऐरणीवर घेऊन नगरचे अथवा महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण देशाचे लक्ष वेधून जायंट किलर उपाधी सिध्द केली.

# लंकेंनी शपथ घेतली आणि नितीनने पायात चप्पल घातली!

## खा. लंके विजयी होईपर्यंत चप्पल न घालण्याचा केला होत संकल्प

**नवी दिल्ली : विशेष प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणूकीत नीलेश लंके हे विजयी व्हावेत यासाठी पायात चप्पल न घालण्याचा संकल्प देहरे येथील नितीन भांबळ या नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या युवा कार्यकर्त्याने केला होता. मंगळवारी लंके यांनी संसदेत शपथ घेतल्यानंतर लंके यांच्या उपस्थितीत नवी दिल्लीत महाराष्ट्र सदर येथे नितीन याने पायात चप्पल घातली.**



■ नीलेश लंके यांच्या विजयासाठी पायात चप्पल न घालण्याचा संकल्प करणाऱ्या नितिन भांबरे या कार्यकर्त्याला शपथ घेतल्यानंतर खा. नीलेश लंके यांनी चप्पल देत संकल्पपुर्ती केली.

लोकसभा निवडणूकीसाठी नीलेश लंके यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आणि नितीन भांबळ यांनी पायातील चप्पल सोडून प्रचारास सुरूवात केली. सर्वसामान्य जनतेसाठी आहोरात्र झटणाऱ्या नीलेश लंके यांनी आतापर्यंत हजारो गोरगरीब जनतेला मदतीचा हात दिला आहे. कोरोना काळात नीलेश लंके यांनी हजारो कोरोना बाधितांना मोफत उपचार दिले. आता संसदेमध्ये सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देणारा खासदार नीलेश लंके यांच्या रूपाने पाठवायचा हे ध्येय डोळयासमोर ठेउन नितीनने मे महिन्यातील उन्हामध्ये पायात चप्पल न घालता नितीन याने संपूर्ण नगर तालुका पिंजून काढला.

४ जुन मतमोजणीचा दिवस उजाडला आणि नितीन याने देवाजवळ प्रार्थना करीत लंके यांच्या गळयात विजयश्री पडावी यासाठी साकडे घातले. प्रत्यक्षात मतमोजणीस सुरूवात झाल्यानंतर सुरूवातीच्या फेऱ्यांमध्ये लंके हे पिछाडीवर पडले आणि नितीनच्या काळजाचा ठोका चुकला. मात्र नीलेश लंके हे ही पिछाडी भरून काढून नक्कीच विजयाकडे वाटचाल करतील याचा विश्वास त्याला होता. अखेर पिछाडी भरून काढत लंके यांनी आघाडी घेतली ती अखेरपर्यंत टीकवत नीलेश लंके यांना विजयी घोषीत करण्यात आले.

लंके यांना विजयी घोषीत केल्यानंतर नितीन याची खऱ्या अर्थाने संकल्पपुर्ती झाली होती. मात्र लोकशाहीच्या पवित्र मंदिरात शपथ घेतल्याशिवाय चप्पल घालणार नाही असा निर्धार नितीन याने केले. अखेर मंगळवारी नीलेश लंके यांनी खासदारकीची शपथ घेतली आणि बुधवारी सकाळी लंके यांनी दिल्लीत स्वतः चप्पल खरेदी करून नितीन याच्या पायामध्ये घातली.

यावेळी संजय गारूडकर, शिरीष काळे, सुनील कोकरे, सचिन काळे, राजेंद्र दौंड, संजय तरटे, दिलीप लाळगे, शशी गव्हाणे आदी उपस्थित होते.

### खा. लंके भाऊक

आपल्या विजयासाठी नितीनने चप्पलचा त्याग केला. माझे जीवाभावाचे कार्यकर्ते माझ्यावर किती प्रेम करतात असे सांगत नीलेश लंके हे नितीन यास चप्पल देताना भाऊक झाले. कार्यकर्त्यांचे हे प्रेम मी कधीही विसरू शकणार नाही. नितीनसारख्या कार्यकर्त्यांची फौज असल्यावर आपण कितीही बलाढय शक्ती असो त्यांना घरी बसविल्याशिवाय राहणार नाही असे लंके म्हणाले.

### तुमच्यासाठी जीवाची बाजी देईल !

लंके यांनी चप्पल दिल्यानंतर नितीनही भाऊक झाला होता. तो म्हणाला नेते आम्ही आणि तुम्ही दोघेही सामान्य कुटूंबातील आहोत. निवडणूक काळात तुमच्यावर खालच्या पातळीवर जाऊन टीका करण्यात आली. ती सहन होत नव्हती. मात्र तुमचा आदेश होता की, सगळे सहन करा, कारण आपल्याला निवडणूक जिंकायची आहे. तुम्हीच आमचे माता पिता आहात, तुमच्यासाठी जीवाची बाजीही देईल अशा भावना नितीन याने व्यक्त केल्या.

# खा. लंके रिक्षातून शरद पवारांच्या भेटीला!

## नीलेश लंके यांच्या साधेपणाचे दिल्लीतही आप्रुप

**नवी दिल्ली : विशेष प्रतिनिधी**

**बुधवारी सकाळी महाराष्ट्र सदनमध्ये असलेले राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या भेटीसाठी नगरचे खासदार नीलेश लंके हे चक्क अँटो रिक्षामधून प्रवास करीत पोहचले.**



■ महाराष्ट्र भवन येथे शरद पवार यांच्या भेटीस जाण्यासाठी खा. नीलेश लंके यांनी अँटो रिक्षातून प्रवास करीत दिल्लीकरांना अश्चर्याचा धक्का दिला.

महाराष्ट्र सदनमध्ये खा. लंके यांच्यासाठी एक खोली देण्यात आली असून तिथे शपथविधीसाठी दिल्लीत आलेल्या महिलांची सोय करण्यात आलेली आहे. त्यामुळे लंके हे हॉटेलमध्ये वास्तव्यास असून बुधवारी सकाळी शरद पवार यांच्या भेटीचा निरोप मिळाल्यानंतर वाहन उपलब्ध नसल्याने लंके यांनी अँटो रिक्षाने महाराष्ट्र भवनापर्यंत पोहचण्याचा पर्याय स्विकारला.

गळयात संसद सदस्याचे ओळखपत्र असलेल्या व्यक्तीने संसद भवनापर्यंत सोडण्याची सुचना केल्यानंतर अँटोचालकही आचंबित झाला. त्याने खा. लंके यांना आदराने महाराष्ट्र भवनापर्यंत पोहचविण्याची तयारी दर्शविली. लंके हे महाराष्ट्र सदनापर्यंत अँटो रिक्षाने पोहचल्याचे तिथे उपस्थित असलेल्या महाराष्ट्रातील नेते तसेच कार्यकर्त्यांनी पाहिल्यानंतर त्यांनीही तोंडात बोट घातले.

दिल्ली येथे नीलेश लंके यांच्यासाठी सध्या वाहनाची व्यवस्था नाही. खा. सुप्रिया सुळे यांचे वाहत ते वापरतात. मात्र खा. शरद पवार यांच्या भेटीचा निरोप आला त्यावेळी लंके यांच्याजवळ एकही वाहन नव्हते. त्यांनी हॉटेलबाहेर येत थेट रिक्षाला हात करून महाराष्ट्र भवन लवकरात लवकर जवळ करण्याचा निर्णय घेतला.

लंके हे सन २०१९ मध्ये आमदार झाले. मात्र त्यानंतरही त्यांचा साधेपणा नेहमीच अनुभवण्यास ◣ उर्वरीत पान ३ वर

# ७ जुलैपासून विठ्ठलाचं २४ तास दर्शन !

## मुख्यमंत्र्यांना दिले आषाढीच्या महापूजेचे निमंत्रण

**सोलापूर : प्रतिनिधी**

**आषाढी यात्रेच्या निमित्ताने येत्या ७ जुलैपासून पंढरपुरातील श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेचे दर्शन २४ तास सुरू राहणार आहे. याबाबतची माहिती मंदिर समितीच्यावतीने माध्यमांना देण्यात आली. आषाढी यात्रा नियोजनासंदर्भात पंढरपुरात मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.**



येत्या १७ जुलै रोजी पंढरपुरात आषाढी यात्रेचा सोहळा पार पडणार आहे. या यात्रेतील शासकीय महापूजेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मंदिर समितीच्या वतीने निमंत्रण देण्यात आले.

दरम्यान, यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांचा औसेकर महाराजांच्या हस्ते विणा, वाकरी पटका, श्रींची मुर्ती, उपरणे, चिपळ्या देऊन सन्मान करण्यात आला. याचवेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन यांचाही मंदिर समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. आषाढी एकादशीच्या दिवशी पहाटे २.२० वाजता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्नीक श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेची शासकीय महापूजा होणार आहे.

# मला ट्रोल करण्याचा प्रयत्न झाला, मी मात्र बगल दिली !

## शपथविधीनंतर खा. लंके यांचा माध्यमांशी संवाद



**नवी दिल्ली : विशेष प्रतिनिधी**

**निवडणूकीच्या प्रचार काळात माझ्यावर आरोप करण्यात आले. संसदेत गेल्यावर इंग्रजीत बोलावे लागते असे सांगितले गेले. तो मुद्दा त्यावेळी गाजला. मला याच मुद्यावरून ट्रोल केले गेले.**

या मुद्याला बगल देण्यासाठी मी बोलायचो की संसदेत इंग्रजी बोलणारा खासदार हवा की तुमची बाजू प्रभावीपणे मांडणारा खासदार हवा ? माझ्या भूमिकेचा प्रभाव मतदारांवर पडल्याचे खा. नीलेश लंके यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

लंके म्हणाले, निवडणूकीत विजय संपादन केल्यानंतर मी एका मुलाखतीदरम्यान सांगितले होते की, संसदेत जाईल तेंव्हा इंग्रजीमध्येच बोलेन. त्यामुळेच मी इंग्रजीत शपथ घेतली.

इंग्रजी बोलण्याची तयारी केली का या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, तयारी करायला ◣ उर्वरीत पान ३ वर










# चंदेरी

# कंगणावर इमरानची टीका...

बॉलिवूडची क्वीन कंगना राणावत अभिनयासह तिच्या वक्तव्यांमुळे चर्चेत असते. ती अनेक विषयांवर तिची मतं मांडत असते. लवकरच तिचा 'इमर्जन्सी' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिने भारताच्या माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली आहे. प्रेक्षक कंगनाच्या या चित्रपटाची आतुरतेने वाट बघत आहेत. आता अभिनेता इमरान हाश्मी याने कंगनाबद्दल भाष्य केलं आहे. कंगनाच्या वागण्यामुळेच तिला इंडस्ट्रीतून बॉयकॉट करण्यात आल्याचा खुलासा त्याने केला आहे. इमरान म्हणाला, की मला वैयक्तिकरित्या विचाराल तर एक माणूस म्हणून आणि कलाकार म्हणून कंगना फार आवडते. चित्रपटसृष्टीत कदाचित तिला काही वाईट अनुभव आले असतील. मी कंगनाबरोबर 'गँगस्टर'सारखा सुपरहीट चित्रपट दिला होता.



त्यात माझी नकारात्मक भूमिका होती पण कंगना त्यात मुख्य भूमिकेत होती. त्यामुळे या इंडस्ट्रीबद्दल कंगनाचं मत नेमकं कधी बदललं, तिने सर्वांना नशेच्या अधीन असल्याचा दावा का केला किंवा घराणेशाहीविरोधात ती एवढी आक्रमक का झाली? याबद्दल मलाही ठावूक नाही. ही फार बालिश गोष्ट आहे अन् यात काहीच तथ्य नाही, असे तो म्हणाला. २०१६ पासूनच कंगनाने बॉलिवूडमधील घराणेशाहीवर भाष्य करायला सुरुवात केली, इतकंच नव्हे तर तिने प्रसिद्ध बॉलिवूड निर्माता व दिग्दर्शक करण जोहरला 'मुव्ही माफिया' म्हणूनही हिणवलं. कंगनाचे गेल्यावर्षी आलेले 'धाकड', 'चंद्रमुखी २', 'तेजस'सारखे चित्रपट बॉक्स ऑफिसवर सपशेल आपटले. एकापाठोपाठ चित्रपट फ्लॉप झाल्यावर कंगनाच्या 'इमर्जन्सी'कडे लोकांच्या नजरा लागल्या आहेत.

# राखीशी डिव्होर्स घेऊन आदिलचा दुसरा निकाह!

राखी सावंतचा पूर्वाश्रमीचा पती आदिल खान दुर्रानी दुसऱ्यांदा लग्नबंधनात अडकला आहे. लोकप्रिय अभिनेत्री व 'बिग बॉस १२' फेम सोमी खानशी त्याने जयपूरमध्ये दुसरं लग्न केलं आहे. लग्नाचे फोटो त्याने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. त्याने ३ मार्च रोजी कुटुंबियांच्या उपस्थितीत सोमीशी निकाह केला.

आदिल खानने त्याच्या लग्नाबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. आदिल म्हणाला, हे माझं पहिलं लग्न आहे. आम्ही सध्या बेंगळुरूमध्ये आहोत. लवकरच मुंबईला जाऊ. आमचा निकाह एका साध्या आणि सुंदर समारंभात पार पडला, हे जाहीर करताना आम्हाला आनंद होत आहे. पती-पत्नी या नात्याने आमचा नवा प्रवास सुरू करण्यास आम्ही उत्सुक आहोत. सुखी वैवाहिक जीवनासाठी कृपया आमच्यासाठी प्रार्थना करा, असंही आदिलने म्हटलं आहे.

दरम्यान, आदिल खान व राखी सावंत यांनी २०२२ मध्ये लग्न केलं होतं, पण हे लग्न त्यांनी लपवून ठेवलं होतं. डिसेंबरमध्ये राखीने लग्नाचे फोटो शेअर करत इस्लाम धर्म स्वीकारून आदिलशी लग्न केल्याचा खुलासा केला होता. इतकंच नाही तर तिने तिचं नावही फातिमा ठेवलं होतं. लग्नाबद्दल माहिती सार्वजनिक केल्यानंतर आदिल व राखीची भांडणं होऊ लागली. तिने त्याच्याविरोधात मारहाण व फसवणुकीची तक्रार दिली आणि पोलिसांनी आदिलला अटक केली. त्यानंतर सहा महिन्यांनी त्याची सुटका झाली होती. तुरुंगातून बाहेर आल्यावर त्याने राखीवर गंभीर आरोप केले होते. राखीने आदिलपासून घटस्फोट घेतल्याचा दावा केला होता. त्यानंतर आता आदिलने सोमीशी लग्न केलंय. ती जयपूरची असून आता मुंबईत राहते. 'न्याय', 'केसरिया बालम' आणि 'हमारा हिंदुस्तान' यांसारख्या अनेक टीव्ही शोमध्ये सोमीने काम केलं आहे. या जोडप्याने जयपूरमध्ये ३ मार्च रोजी निकाह केल्याचे सांगण्यात आले.




# ऋतानं सांगितलं, का घेतलं घर!

मराठीतील लोकप्रिय अभिनेत्री ऋता दुर्गुळे नेहमीच चर्चेत असते. 'फुलपाखरू' मालिकेतून ऋता घराघरांत पोहचली. अभिनयाच्या जोरावर ऋताने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. ऋताने मुंबईत स्वतःचे हक्काचे घर घेतले. एका मुलाखतीत ऋताने तिच्या नवीन घराबाबत सांगितलं आहे.

ऋता म्हणाली, मी कधीच स्वतःच्या घरात राहिलेली नाही. गेली ३० वर्षे मी आई-बाबांबरोबर भाड्याच्या घरात राहत आले आहे. आम्ही आतापर्यंत जवळपास ११ घरं बदलली आहेत. मला फार मोठं घर नको होतं. पण, मला नेहमी असं वाटायचं की, उद्या माझं लग्न झाल्यानंतर आपलं एक हक्काचं घर असावं जिथून माझ्या आई-वडिलांना कुणी काढून टाकणार नाही. मला माझ्या भावाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहायचे होते. त्यामुळे काहीही करून मला घर घ्यायचंच होतं. देवाच्या कृपेनं कोणत्याच गोष्टीत मला तडजोड करावी लागलं नाही. मी आता एखादा प्रोजेक्ट करून सहा महिने निवांत फिरू शकते. त्यामुळे मी आता माझ्या भावाला सांगते की, काहीच विचार करायची गरज नाही, असे ती म्हणाली. ऋता दुर्गुळेच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास आतापर्यंत तिने सुपरहिट मालिका व चित्रपटांमध्ये काम केले आहे. शुक्रवारी (८ मार्च) ऋताचा 'कन्नी' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.



या चित्रपटात तिच्याबरोबर शुभंकर तावडे, अजिंक्य राऊत, वल्लरी विराज व ऋषी मनोहर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. ऋता दुर्गुळेने १८ मे २०२२ रोजी दिग्दर्शक प्रतीक शाहबरोबर लग्नगाठ बांधली. कुटुंबीय व मित्र परिवाराच्या उपस्थितीत हा लग्नसोहळा पार पडला. या लग्नाला मनोरंजनसृष्टीतील अनेक कलाकारांनी हजेरी लावली होती.

# दिशाला अभिनेत्री होण्यास 'या' सेलिब्रिटीने केली मदत!

अभिनेत्री दिशा पटानी 'योद्धा' या तिच्या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. या ॲक्शन चित्रपटाच्या ट्रेलर लाँचचा कार्यक्रम गुरुवारी झाला. निर्माता करण जोहर, अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा, अभिनेत्री राशी खन्ना आणि दिशा पाटनी यांच्यासह 'योद्धा' च्या संपूर्ण टीमने हजेरी लावली होती. या कार्यक्रमात दिशाने, जेव्हा ती मॉडेलिंग करत होती तेव्हा करणने तिला पाहिलं आणि अभिनेत्री म्हणून काम करण्याची संधी दिली, असा खुलासा केला. दिशा पटानी म्हणाली, की मी आज अभिनेत्री आहे ती फक्त करण जोहरमुळे. कारण तोच होता ज्याने मला मॉडेलिंग करताना पाहिलं होतं आणि तेव्हा मी केवळ १८ वर्षांची होते. मला अजूनही असं वाटत जर करणने तेव्हा मला पाहिलं नसत तर मी आज या




क्षेत्रात नसते. दिशाच्या या विधानानंतर, करण तिला 'आय लव्ह यू' म्हणाला. या संभाषणात सिद्धार्थनेही भाग घेतला आणि त्यानेही करणचं कौतुक केलं. असली हिरे की पेहेचान 'जोहर' को ही है, असं सिद्धार्थ म्हणाला. दरम्यान, दिशाच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, 'एम एस धोनी : द अनटोल्ड स्टोरी' या चित्रपटातून दिशाने हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण केलं. यासाठी तिला आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट अकादमीचा (IIFA) पुरस्कारही मिळाला होता. त्यानंतर दिशा 'बागी २', 'मलंग', 'एक विलन रिटर्न्स' यांसारख्या चित्रपटांमध्ये दिसली होती. आता 'योद्धा'या आगामी चित्रपटात दिशा झळकणार आहे. हा चित्रपट १५ मार्च २०२४ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## कतरिनाने विकीचं कौतुक केलं, क्रेडीट सासू-सासऱ्यांना

बॉलीवूड अभिनेत्री कतरिना कैफ आणि अभिनेता विकी कौशल यांनी ९ डिसेंबर २०२१ रोजी लग्नगाठ बांधली. या दोघांचा शाही विवाहसोहळा राजस्थानमध्ये पार पडला होता. लग्नानंतर कतरिनाने विकीच्या संपूर्ण कुटुंबाला आपलंसं केलं. अलीकडेच एका मुलाखतीत अभिनेत्रीने तिच्या सासू-सासऱ्यांचं भरभरून कौतुक केलं आहे. कतरिना कैफने पती विकी कौशलसह तिच्या सासू-सासऱ्यांचं कौतुक केलं. ती म्हणाली, विकी विविध भूमिकांमध्ये अगदी व्यवस्थित फिट होतो. एखादी भूमिका तो ज्या पद्धतीने साकारतो ते खरंच अविश्वसनीय आहे. मी सुद्धा एक कलाकार असल्याने विकी नवनवीन काय करतोय याची नेहमीच माझ्या मनात उत्सुकता निर्माण झालेली असते. तो खरंच एक अष्टपैलू अभिनेता आहे. हे केवळ मी त्याची पत्नी आहे म्हणून बोलत नाही. तुम्ही सुद्धा त्याचा अभिनय पाहिलेला आहे, असे ती म्हणाली. विकी नुकताच 'सॅम बहादूर' चित्रपटात झळकला होता. आता लवकरच तो बहुचर्चित 'छावा' चित्रपटामध्ये झळकणार आहे. पंजाबी कुटुंबात लग्न करण्याबद्दल आणि सासू-सासऱ्यांविषयी सांगताना कतरिना म्हणाली, की लग्न म्हणजे दोन मोठी कुटुंब एकत्र येतात. आमच्या लग्नाला अनेकजण पंजाबहून आले होते. ज्यांना मी पहिल्यांदाच भेटले. त्यात आमचं कुटुंबही खूप मोठं आहे. मला एकूण सहा बहिणी आहेत. त्यामुळे आमच्या दोन्ही कुटुंबांनी लग्नात खूप मजा केली. माझ्या लग्नानंतर मला घरी भरपूर प्रेम, चमचमीत पदार्थ खायला मिळतात.

# अंबानीच्या सोहळ्यात नाचलेल्या ३ खानना किती मिळाले पैसे...

अनंत अंबानी-राधिका मर्चंट जुलै महिन्यात लग्नबंधनात अडकणार आहेत. पण त्यापूर्वी १ मार्च ते ३ मार्च दरम्यान अनंत-राधिका यांचा प्री-वेडिंग सोहळा मोठ्या थाटामाटात पार पडला. या तीन दिवसांच्या सोहळ्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. तसंच या सोहळ्याला हॉलीवूड, बॉलीवूड, राजकीय, क्रीडा, उद्योग क्षेत्रातील दिग्गज मंडळींनी उपस्थिती लावली होती. अनंत-राधिका यांच्या प्री-वेडिंग सोहळ्याची चर्चा फक्त देशातच नाही तर जगभरात होत आहे. मुकेश अंबानींनी कोणत्या सेलिब्रिटीला किती मानधन दिलं? लेकाच्या या शाही प्री-वेडिंगसाठी किती खर्च केला? याविषयी सध्या चर्चा रंगली आहे.



सोहळ्याच्या पहिल्या दिवशी, १ मार्चला जगप्रसिद्ध पॉप स्टार रिहानाचा परफॉर्मन्स झाला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी संगीत सोहळा झाला. यामध्ये बॉलीवूडच्या सेलिब्रिटींनी जबरदस्त परफॉर्मन्स केला. तिसऱ्या दिवशी, ३ मार्चला 'टस्कर ट्रेल्स' आणि 'हस्ताक्षर' कार्यक्रम झाला. 'टस्कर ट्रेल्स' हा आउटडोअर कार्यक्रम होता. ज्याद्वारे पाहुण्यांना जामनगर, वनतारा फिरवलं. त्यानंतर रात्री भव्य महाआरती आणि अनंत-राधिका यांची हस्ताक्षर सेरेमनी पार पडली. माहितीनुसार, या संपूर्ण सोहळ्यासाठी अंबानींनी तब्बल १००० कोटींचा खर्च केल्याचं म्हटलं जात आहे. महत्त्वाची बाब म्हणजे मुकेश अंबानींनी लेकाच्या प्री-वेडिंगसाठी जी रक्कम खर्च केली आहे, ती त्यांच्या एकूण संपत्तीच्या केवळ ०.१% इतकीच आहे. त्यामुळे बॉलीवूडच्या तीन महागड्या सुपरस्टार्सना किती बरं मानधन दिलं असेल? असा प्रश्न पडलाच असेलच. शाहरुख खान, सलमान खान आणि आमिर खानने अंबानींच्या लेकाच्या प्री-वेडिंग सोहळ्यात परफॉर्म करण्यासाठी एकही रुपया न घेतल्याचं समोर आलं आहे. शाहरुख, सलमान आणि आमिरला एकत्र आणण्याचा निर्णय अचानक घेतला होता. यापैकी एकानेही परफॉर्म करण्यासाठी एक रुपया देखील घेतला नाही. बॉलीवूडच्या या तीन खानने संगीतच्या कार्यक्रमात 'नाटू नाटू' या गाण्यावर जबरदस्त डान्स केला होता. यावेळी या तीन खानबरोबर दाक्षिणात्य सुपरस्टार राम चरण देखील पाहायला मिळाला. त्यामुळे त्याने देखील परफॉर्मन्ससाठी कोट्यवधी रुपये घेतले असतील असं म्हटलं जात होतं. पण त्याने देखील अंबानींकडून एकही रुपया घेतला नाही.

## अबब... रिहानाला दिले इतके पैसे



मुकेश अंबानींनी मोठा मुलगा आकाश अंबानीच्या लग्नात जगप्रसिद्ध गायिका बियोंसेला परफॉर्मन्साठी बोलावलं होतं. त्याप्रमाणे छोट्या मुलाच्या प्री-वेडिंगमध्ये जगप्रसिद्ध पॉप स्टार रिहानाला अंबानींनी १ मार्चला बोलावलं होतं. रिहानाला काही तासांच्या परफॉर्मन्ससाठी मुकेश अंबानींनी किती मानधन दिलंय माहितीये? डेली मेलच्या वृत्तानुसार, रिहानाला तब्बल ५२ कोटी रुपये दिले आहेत. याशिवाय केटरिंगवर १६५ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. गेल्या वर्षी १९ जानेवारीला अनंत अंबानी व राधिका मर्चेंट यांचा मोठ्या धुमधडाक्यात साखरपुडा झाला होता.

# 'डॉन 3'साठी कियाराने घेतले १२,००,००,०००/-

कियारा अडवाणी बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक मानली जाते. आपल्या अभिनयाने कियाराने अनेकांना भूरळ पाडली आहे. आतापर्यंत तिने अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे. आता लवकरच ती फरहान खान दिग्दर्शित 'डॉन ३' चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर रणवीर सिंहची प्रमुख भूमिका आहे. आता डॉन ३ साठी कियारा अडवाणीने किती पैसै घेतले, याबाबतची माहिती समोर आली आहे...




कियारा अडवाणी मुख्य अभिनेत्रीची भूमिका साकारणार असून, सुरुवातीला या भूमिकेसाठी क्रिती सेनॉनचा विचार करण्यात आला होता. मात्र, आता कियाराच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. कियाराने या चित्रपटासाठी तब्बाल १२ कोटी रुपये फी घेतली आहे. ही फी आतापर्यंतच्या तिच्या मानधनापैकी सगळ्यात जास्त असल्याचे सांगण्यात येते. अभिनेत्रीने वॉर चित्रपटासाठी जेवढे मानधन घेतले होते त्याच्यापेक्षा दुप्पट मानधन तिने 'डॉन ३' साठी घेतले आहे. डॉन २ मध्ये शाहरुखबरोबर प्रियांका चोप्रा झळकली होती. त्यामुळे डॉन ३ मध्येही जंगली बिल्ली म्हणून प्रियांकाच दिसणार अशीही चर्चा होती. मात्र, शाहरुख व प्रियांकाने या चित्रपटातून काढता पाय घेतल्यानंतर रणवीर व कियाराच्या नावाची घोषणा करण्यात आली. डॉन ३ च्या माध्यमातून रणवीर व कियाराची जोडी पहिल्यांदाच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा चित्रपट पुढील वर्षी म्हणजे २०२५ मध्ये प्रदर्शित होणार आहे. 'डॉन' सिरीजमधील या अगोदरचे दोन्ही चित्रपट चांगलेच गाजले होते. चित्रपटाच्या पहिल्या भागात अमिताभ बच्चन यांनी डॉनची भूमिका साकारली होती. दुसऱ्या भागात शाहरुख खान डॉन बनला होता. आता 'डॉन ३' मध्ये रणवीर कपूर व कियारा अडवाणी आपल्या अभिनयाची जादू चालवणार का हे लवकरच बघायला मिळेल.

# झील मेहता बनली बिझनेस वुमन!

तारक मेहता का उल्टा चष्मा फेम झील मेहता सध्या चर्चेत आहे. अलीकडेच तिने तिचा बॉयफ्रेंड आदित्यसोबतच्या साखरपुड्याचे फोटो पोस्ट करून चाहत्यांना आनंदाची बातमी दिली होती. शोमध्ये सोनूची व्यक्तिरेखा साकारणारी झील बऱ्याच दिवसांपासून शोपासून दूर आहे. पण सोशल मीडियावर ती लोकप्रिय आहे. आता या २८ वर्षीय तरुणीने आपल्या करिअरबद्दल एक खुलासा करून चाहत्यांना तिचा अभिमान वाटेल, अशी गोष्ट सांगितली आहे. झीलने आपण एक बिझनेस वुमन असल्याचे सांगितले...

झील मेहताबद्दल एक गोष्ट आपल्या सर्वांना माहीत आहे ती म्हणजे ती एक अप्रतिम मेकअप आर्टिस्ट आहे. पण आता तिने खुलासा केला आहे की ती एक व्यवसायदेखील चालवते. शिकण्यासाठी अभिनय सोडलेल्या झीलने यापूर्वी सांगितले होते की ती मेकअप आर्टिस्ट बनली आहे. माझा सेफ स्टुडंट हाउसिंग नावाचा व्यवसाय आहे. हे विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह आहे. बाहेरून मुंबईत शिकण्यासाठी येणाऱ्यांना मी राहण्याची सोय करते, असे तिने सांगितले. झील मेहताने बीबीएचे शिक्षण घेतले आहे आणि आता ती फायनान्समध्ये पुढील शिक्षण घेत आहे. 'मी तारक मेहता... शो सोडला कारण मी १० वी बोर्डाची परीक्षा देणार होते. बोर्डाच्या परीक्षेची तयारी करण्याची किती गरज असते हे तुम्हाला माहीत आहे. यामुळे मी शो सोडण्याचा निर्णय घेतला. टीव्हीवर काम करावं हे माझ्या बालपणीचं स्वप्न होतं. मी माझे स्वप्न पूर्ण केले, त्यानंतर मी माझ्या अभ्यासावर लक्ष केंद्रित केला. आता मी व्यवसाय करत आहे आणि आता तोच चालू ठेवू इच्छितो, असेही ती म्हणाली.



## शाळेतली मैत्री आणि प्रेम

झीलने अलीकडेच बॉयफ्रेंड आदित्यसोबत साखरपुडा केला. तिने सांगितले की ते दोघेही बालपणीचे मित्र आहेत. झील आणि आदित्य यांची भेट शाळेत झाली, तर दहावीत असताना दोघांचे मैत्री पलिकडले नाते सुरू झाले. झील मेहता तारक मेहता का उल्टा चष्मा या शोमधून बाहेर पडल्यानंतर पलक सिंधवानी सोनूची भूमिका साकारत आहे. झीलच्या आधी ही भूमिका निधी भानुशालीने साकारली होती.



## शॉर्ट न्यूज

### पंकजा मुंडेंसाठी भगवान बाबांना साकडे

■ **नगर :** ओबीसी समाजाच्या नेत्या पंकजा मुंडे यांच्या राजकीय पुर्नवसनासाठी अहिल्यानगर शहरातील ओबीसी समाज व मुंडे समर्थकांनी सावेडी उपनगरातील निर्मलनगर येथील भगवान बाबांच्या मंदिरात महाआरती करुन साकडे घातले. यावेळी ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकल ओबीसी समाज हा पंकजा मुंडेना मानणारा आहे. त्यांचा पराभव सर्वांच्या जिव्हारी लागला आहे. त्यांचे लवकरात लवकर राजकीय पुर्नवसन करतांना राज्यसभेवर नियुक्ती करुन मंत्रीपद द्यावे, अशी एकमुखी मागणी भगवानबाबांच्या मंदिरात महाआरती प्रसंगी कार्यकर्त्यांनी केली.

### काष्टी येथे एकाचं रात्री दोन दुकानात चोरी

■ **श्रीगोंदा :** मागील महिनाभरापासून तालुक्यातील काष्टी परिसरात चोऱ्यांचे सत्र सुरू असतानाच काष्टी येथील अजनुज चौकात दोन दुकानांचे पत्रे उचकटून दुकानातील रोख रकमेसह सुमारे सव्वा दोन लाखांचा मुद्देमाल चोरुन नेल्याची घटना काल पहाटे घडली. या घटनेने व्यापाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली असून पोलिसांनी चोऱ्यांचा कसून तपास करून आरोपींना अटक करण्याची मागणी होत आहे.

### श्रीरामपूर शहरात गोमांस जप्त

■ **श्रीरामपूर :** शहरातील मिलत्तनगर परिसरामध्ये पोलिसांनी मिळालेल्या गुप्त माहितीवरून छापा टाकून २२५० किलो मांस व साडेचार लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिस निरीक्षक नितीन देशमुख यांनी कारवाई केली. हारुण अब्दुलनबी कुरेशी (रा. मिल्लतनगर) येथे काही लोक जनावरांची कत्तल करत असल्याचे समजले. पोलिस पथकाने पशुवैद्यकीय अधिकारी व दोन पंच यांच्यासमवेत कारवाई केली असता तेथे जनावरांचे मांसाचे तुकडे मिळून आले.

### डांबरी रस्त्यावरील खड्डे बुजवाः सचिन दिघे

■ **संगमनेर :** तालुक्यातील तळेगाव दिघे मार्गे असलेल्या संगमनेर ते कोपरगाव दरम्यान तळेगाव चौफुली परिसरात डांबरी रस्त्यावर ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. सदर डांबरी रस्त्यावरील खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागाने त्वरित बुजवावेत अशी मागणी संगमनेर शेतकरी संघाचे संचालक सचिन दिघे यांनी केलीं आहे. डांबरी रस्त्यावरील खड्डे अपघातास निमंत्रण देत आहेत. त्यामुळे रस्ता दुरुस्तीची त्वरित कार्यवाही करावी असे त्यांनी म्हटले आहे.

### सागर अहिरे यांना राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार

■ **कोपरगाव :** क्रीडा संस्कृती फौंडेशन यांच्या वतीने आत्मा मालिक माध्य. गुरुकुल या शाळेतील शिक्षक यांना राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्रातील विविध जिल्यातील शिक्षकांना हा पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते सण २०२४-२५ साठी दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सागर अहिरे यांना पद्मश्री मा. ब्रम्हानंद सांगून कामत शंकरवाल अर्जुन पुरस्कार विजेते यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# फक्त घोषणा करायच्या ; द्यायचं तर काहीच नाही

## जयंत पाटील सरकारवर संतापले !



**मुंबई: प्रतिनिधी**

**आता सगळ्या योजना जाहीर होतील, अर्थसंकल्पात खैरात करण्यात येईल. महिलांना महिन्याला पैसे देण्याची घोषणा होईल, लहान मुलींना पैसे देण्याची घोषणा होईल, युवकांच्या बेरोजगारीबाबत घोषणा होईल. फक्त घोषणा करायच्या, द्यायचं तर काहीच नाही, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जयंत पाटील यांनी केली आहे.**

राज्याचे अर्थसंकल्पीय तसेच पावसाळी अधिवेशन गुरुवारपासून सुरू होत असून त्या पार्श्वभूमीवर निधी वाटपाच्या तसेच अनेक योजनांची घोषणा होण्याची शक्यता आहे. यावर पाटील यांनी जोरदार टीका केली आहे. पाटील म्हणाले की, अडीच महिन्यांनी निवडणुका आहेत म्हणून ज्या गोष्टी पूर्ण करता येणार नाहीत. ज्या अर्थसंकल्पाला सुसह्य होणार नाहीत अशा सगळ्यांची खैरात आता दोन दिवसांत पाहायला मिळेल. सरकार घाबरलेले आहे. त्यांना खात्री आहे की आपण पुढच्या वेळी निवडून येत नाही. त्यामुळे शेवटचा प्रयत्न म्हणून अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या जनतेला वेगळे काहीतरी दिसेल.

**राम मंदिराच्या कामाची चौकशी व्हावी**

राम मंदिराची बांधकाम पहिल्या पावसातच गळायला लागले असेल तर ही अतिशय गंभीर बाब आहे. जगभरातील सर्व रामभक्तांचा हा अवमान आहे. राम मंदिराच्या गळतीसंदर्भात चौकशी झाली पाहिजे, निकृष्ट दर्जाचे बांधकाम करण्यासाठी कोण जबाबदार आहे, याची चौकशी झाली पाहिजे. घाईने बांधकाम करा व निवडणुकीआधी मंदिराची सुरुवात करा आणि पहिली पूजा करण्याचा मान मिळविण्यासाठी जे खटाटोप करत होते त्या सर्वांची चौकशी व्हावी, अशी मागणीही पाटील यांनी केली.

# चोर असल्याच्या संशयातून युवकाला मारहाण

## खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल




**नगर : प्रतिनिधी**

**शहरातील सारसनगर परिसरातील औसरकर मळा येथे राहत असलेल्या एका युवकाला चोर असल्याच्या संशयातून पाच जणांनी वृक्षाच्या खोडाला बांधून मारहाण केली. या संदर्भात भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

औसरकर मळा येथे चोरीच्या उद्देशाने आल्याच्या संशयातून राजेश हिरा घोष (रा. पश्चिम बंगाल) याला मारहाण करण्यात आली. राजेश हा काम शोधण्यासाठी औसरकर मळा परिसरात गेला होता. या मारहाणीत राजेश गंभीर जखमी झाला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावरही व्हायरल झाला. या प्रकरणी किरण भगवान औसरकर, बाबासाहेब भगवान पुंड, विशाल किसन इवळे, ऋषिकेश जायभाय व ऋत्विक पुंड (सर्व रा. औसरकर मळा, सारसनगर, नगर) यांच्या विरोधात भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शरद पवार गटात सूर्यकांता पाटील यांचा प्रवेश

## भाजपात जाऊन घोडचूक केल्याची पाटील यांची कबुली

**मुंबई : प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत माजी केंद्रीय मंत्री सूर्यकांता पाटील यांनी शनिवारी पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष मुंबईतील पक्ष कार्यालयात पक्षप्रवेश झाला आहे.**



**त्यांचे राजकारण विचारावर आधारित**

पक्षप्रवेशावेळी मार्गदर्शन करताना शरद पवार साहेब म्हणाले की, सूर्यकांताताई पाटील यांनी मध्यल्या काळात त्यांनी वेगळा निर्णय घेतला होता. पण त्या कुठेही गेल्या तरी त्यांच्या मनात केवळ राष्ट्रवादीच आहे. त्यांचं राजकारण विचारांवर आधारित होतं. त्यामुळे त्या पुन्हा येतील हा विश्वास होता, अतिशय योग्य वेळी त्यांनी आता निर्णय घेतला आहे. सामाजिक ऐक्य टिकवण्याचे आपल्यासमोर आव्हान आहे. मराठवाड्यात आपल्याला जे चित्र बघायचं त्यात त्यांचा हातभार लागेल असा विश्वासही शरद पवार साहेबांनी व्यक्त केला.

**सामाजिक ऐक्याच्या संबंधी तडजोड नाही**

शरद पवार म्हणाले, राज्याचे मुख्यमंत्री सर्वपक्षीय लोकांची बैठक बोलाविण्याच्या विचारात आहेत. ज्याअर्थी त्यांनी पुढाकार घेतला आहे, त्याअर्थी आम्ही कुणीही या विषयात राजकारण आणण्याचा प्रश्न येत नाही. याच्यातून सामंजस्यातून पर्याय काढण्याच्या प्रयत्न करत असेल तर आमची सरकारला साथ राहिल. सामाजिक ऐक्याच्या संबंधी तडजोड नाही. ओबीसी किंवा मराठा घटक असो किंवा अन्य घटक असो त्यांच्यात एकप्रकारची दुही असणे ही राज्याच्या दृष्टीने योग्य नाही. तसंच, काहीही करायचं, पण आमच्यात एकवाक्यता राहिली पाहिजे असेही शरद पवार साहेब म्हणाले.

**मोठा सोहळा करायचा होता, पण...**

जयंत पाटील म्हणाले की, आज सुर्यकांताताई पाटील या पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षामध्ये प्रवेश केला आहे. सुर्यकांताताई यांचा आजचा पक्षप्रवेश मोठ्या प्रमाणात करायचा होता. परंतु पवार साहेबांना अधिवेशनाकरिता दिल्लीला जाणार आहे. म्हणून हा छोटेखाणी पक्षप्रवेश कार्यक्रम करण्यात आला आहे. सूर्यकांताताई आम्ही लहान होतो तेव्हा पासून काम करत होते. त्यांचे वडील हे स्वातंत्र्य सैनिक होते. सूर्यकांताताई हे निर्भीडपणे मत मांडणारे आहेत. पण मागच्या दीड वर्षा पासून आमचा त्यांच्याशी संवाद सुरु आहे. अनेक मंडळी पवार साहेबांना भेटत आहे. त्यांच्यावर तरुणांचा सगळ्यांचा विश्वास आहे. अनेक भागातले तरुण आणि मंडळी पवार साहेबांसोबत काम करण्याची इच्छा व्यक्त करत आहे. सूर्यकांता ताई यांचं मी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षांमध्ये मी ताईचे स्वागत करतो. असे जयंत पाटील म्हणाले.

**भाजपात जाऊन मी घोडचूक केली**

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश झाल्यानंतर बोलताना सूर्यकांताताई पाटील म्हणाल्या की, भाजपात जाऊन मी घोडचूक केली. मी भाजपात गेले तरी तिथं काहीच काम केलं नाही. मी रागामुळे राष्ट्रवादीतून बाहेर पडले होते. मात्र भाजपात जाऊनही दहा वर्षात मी तिथं काहीच केलं नाही. फक्त घरात बसून होते. कधीही कुणाला मत देण्याचं आवाहनही मी केलं नाही. पक्ष सोडतेवेळी शरद पवार साहेब मला म्हणाले होते की त्यांची विचारसरणी वेगळी आहे तिथं जाऊन तू काय करणार? अशी आठवण सूर्यकांता पाटील यांनी यावेळी सांगितली.

सूर्यकांता पाटील पुढे म्हणाल्या, साहेब आता तुम्ही फक्त आदेश द्या. तुम्ही म्हणाल ते काम करायला मी तयार आहे. याआधी मीच रागात पक्षाला सोडंल होतं. दहा वर्ष भाकऱ्या भाजल्या. नातवंडांना मोठं केलं. शेती केली. पण आता मला काम करण्याची संधी द्या. १९९९ मधील सूर्यकांता समजून माझ्यावर जबाबदारी टाका. मी भाजपात जाऊन घोडचूक केली. पक्ष सोडताना साहेब मला म्हणाले होते की तिथं जाऊन काय करणार. पण त्यावेळी मी काही त्यांचं ऐकलं नाही. माझी दहा वर्षे वाया गेली तिथं मला काहीच करता आलं नाही, अशी खंत सूर्यकांताताई पाटील यांनी यावेळी व्यक्त केली.

(पान १ वरून)

## खा. लंके रिक्षातून शरद पवारांच्या भेटीला!

मिळाला. अनेकदा त्यांनी दुचाकीवरून प्रवास केला. कधी मारूती ओमीनी तर कधी मारूती ८०० कारमध्ये प्रवास करतानाही त्यांना अनेकांनी पाहिले आहे.मुंबईत आमदार निवासमध्ये लंके हे नेहमीच जमीनीवर झोपणे पसंत केले. कोव्हीड सेंटरमध्येही हे सर्वसामान्य कार्यकर्त्यांसोबत जमीनीवर झोपल्याची अनेक छायाचित्रे सोशल मिडियावर मोठया प्रमाणावर व्हायरल झाले आहेत.

**मला ट्रोल करण्याचा प्रयत्न झाला, मी मात्र बगल दिली !**

एवढं अवघड काय नसते. कोणी आईच्या उदरातून शिकून येत नाही. पाण्यात पडल्यावर पोहतो. इंग्रजी शपथ घ्यायची होती, ती घेऊन टाकली. माझंही शिक्षण आहेच ना ? असा प्रती सवाल लंके यांनी केला.
इंग्रजीत शपथ घेऊन डॉ. सुजय विखे यांना उत्तर दिले का असा प्रश्न विचारण्यात आला असता लंके म्हणाले, उत्तर नाही म्हणता येणार. विषय सोडून द्यायचा आणि आता जोमाने कामाला लागायचे. लोकांचं ऐवढं मोठं कर्ज डोक्यावर आहे. आता लोकांचं काम करायचं आहे. लोकांना रिझल्ट द्यायचा असल्याचे लंके यांनी सांगितले.









# अंगारकी चतुर्थीनिमित्त गणेशखिंडीत भाविकांची रीघ

**■ हजारो भाविकांनी घेतला दर्शनाचा लाभ ■ गणेश मंदिर ट्रस्टच्या वतीने दर्शन रांगा, फराळाची व्यवस्था**



■ अंगारकी चतुर्थी निमित्त गणेशखिंड येथे भाविकांची दर्शनासाठी रीघ लागली होती.

### पायी दिंडी सोहळा

**अंगारकी चतुर्थी निमित्त लोणीहवेली ते गणेशखिंड अशा पायी दिंडी सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. निळोबाराय दिंडी सोहळयाच्या वतीने या दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. पारनेर येथे या दिंडीसोहळयासाठी बाबाजी औटी-खडके यांच्या वतीने फराळाची व्यवस्था करण्यात आली होती.**

पारनेर : प्रतिनिधी

**अंगारकी चतुर्थी निमित्त एकमेव मंगळाचा गणपती म्हणून ओळख असलेल्या पारनेर शहरानजीकच्या गणेशखिंड येथील श्री.भालचंद्र गणेशाच्या दर्शनासाठी मंगळवारी भाविकांची मोठी रीघ लागली होती.**

सकाळी सहा वाजता नगर येथील नीलेश प्रकाश गावडे यांच्या हस्ते श्रीं चा अभिषेक पार पडला. सकाळी सात वाजता बेल्हे येथील दिनेश जालिंदर काळे यांच्या हस्ते होमहवन व गणेशयाग पुजा, सकाळी ९ वाजता वडझिरे येथील बाबाजी सबाजी करकंडे यांच्या हस्ते सत्यनारायण महापुजा पार पडली. त्यानंतर रात्री उशिरापर्यंत भक्तांच्या दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या.

गणेशखिंड येथे जाण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने पारनेर आगारातून दर तासाला बसेसची व्यवस्था करण्यात आली होती. त्याचा भाविकांची लाभ घेतला. दर्शनासाठी आलेल्या भाविकांसाठी स्वयंभु गणेश मंदिर ट्रस्टच्या वतीने मोफत फराळाची व्यवस्था करण्यात आली होती. श्री कन्स्ट्रक्शन व श्री एंटरप्राईजेसचे राजू भोर यांच्या वतीने भाविकांसाठी पिण्याचे शुध्द पाणी उपलब्ध करून देण्यात आले होते. रात्री आठ वाजता काकणेवाडी येथील श्रीराम भजनी मंडळाच्या भजनाचा कार्यक्रम पार पडला.

भारतातील एकमेव मंगळाचा गणेश म्हणून या देवस्थानाची ख्याती आहे. गणेश पुराणामध्ये ओवी क्र. ६१ मध्ये गणेश खिंडीतील भालचंद्र गणेशाचा उल्लेख आढळतो. नवसाला पावणारा भालचंद्र गणेश अशी भाविकांची श्रध्दा असून दर चतुर्थी तसेच अंगारकी चतुर्थीला भाविक दर्शनासाठी मोठी गर्दी करतात. स्वयंभू गणेश मंदिर ट्रस्ट, पुणेवाडी, चिंचोली, बांगरवाडी, हत्तलखिंडी, वडझिरे, पिंपरीजलसेन, सिध्देश्ववाडी, निघोज तसेच पारनेर येथील ग्रामस्थांच्या वतीने भाविकांसाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

### महाप्रसादाचे मानकरी

**दिनेश काळे, नीलेश गावडे, इंजि. प्रसाद झावरे, बाबाजी करकंडे, नितीन झिटे, अशोक लंके, बाळासाहेब बोरूडे, बाळकृष्ण कुलकर्णी, रावसाहेब पुजारी, शिंदे सर, प्रकाश सावंत, हॉटेल विनायक स्मृती, विशाल झावरे, निखिल दाते.**

# लंके यांच्या मान सन्मानामुळे निघोजकर भारावले!

**लंके यांच्या शपथविधीसाठी निघोजकर दिल्लीत**

निघोज : प्रतिनिधी

**एक सर्वसामान्य शेतकरी तसेच प्राथमिक शिक्षकाचा मुलगा प्रस्थापित असलेल्या भाजपाचे मा. खा. डॉ. सुजय विखे यांना पराभूत करून संसदेत पोहचल्याने दिल्लीमध्ये खासदार नीलेश लंके यांना विविध पक्षांचे नेते, कार्यकर्ते तसेच अधिकारी वर्गाकडून मान सन्मान मिळत असून ते पाहून लंके यांच्या शपथविधीसाठी नवी दिल्ली येथे गेलेले निघोजकर ग्रामस्थ भारावून गेले.**

संसद परिसरात खा. लंके हे पोहचल्यानंतर तिथे उपस्थित असलेल्या मान्यवरांसाठी लंके यांचेच आकर्षण होते. ते पाहून निघोजकरांचा आनंद गगणात मावेनासा झाला.

कांदा उत्पादक व्यवसायीक संघटनेचे अध्यक्ष, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त तसेच जी.आर.एल कंस्ट्रक्शनचे संचालक गणेश लामखडे, कन्हैय्या दुध उद्योग समुहाचे संदीप लंके, व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी किसन कवाद, राजू कवाद, अर्जुन वराळ, ओम रसाळ, श्रावण रसाळ, अपूर्वा कवाद हे उपस्थित होते. लंके यांनी संसदेत शपथ घेतल्यानंतर निघोजकरांनी खा. लंके यांची महाराष्ट्र सदन येथे भेट घेऊन त्यांचा सत्कार केला.



■ पारनेर तालुका कांदा उत्पादक व्यवसायीक संघटनेचे अध्यक्ष व मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त गणेश लामखडे, संतोष रसाळ यांनी दिल्ली येथे खा. नीलेश लंके यांचा सत्कार केला.

### खा. लंके महाराष्ट्राचे भुषण

**खा. लंके हे नगर जिल्हयाचे नव्हे तर महाराष्ट्राचे भुषण असून संसदेमध्ये त्यांची कारकिर्द विधानसभेप्रमाणेच सर्वोत्तम असेल. सर्वसामान्य जनता तसेच शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काम करणारा खासदार असा त्यांचा नावलौकीक होईल असा आम्हाला विश्वास आहे.**

**गणेश लामखडे, संतोष रसाळ**

### मान, सन्मान पाहून भारावलो

**रसाळ व लामखडे यावेळी म्हणाले, अनेक वेळा व्यवसायानिमित्त दिल्ली येथे अनेकदा येण्याचा योग आला. मात्र खा. लंके हे संसदेत पोहचल्यानंतर प्रथमच दिल्ली येथे आलो असता येथील वातावरण बदललेले जाणवले. महाराष्ट्र सदनामध्ये येणारा प्रत्येकजण लंके यांची आवर्जुन चौकशी करताना आम्ही अनुभवले. खा. लंके यांना मिळणारा मान सन्मान पाहून आम्ही भारावून गेलो.**

# जातीभेद हटविण्यासाठी राजश्री शाहू महाराजांचे कार्य महत्त्वपूर्ण - ॲड. बाळासाहेब लामखडे



निघोज : प्रतिनिधी

**राजश्री शाहू महाराज यांनी सामाजिक न्याय देण्यासाठी व समाजातील जातीभेद व विषमता हटविण्यासाठी राजश्री शाहू महाराज यांचे कार्य महत्वपूर्ण असून आजच्या राज्यकर्त्यांनी त्यांचे अनुकरण करण्याची खऱ्या अर्थाने गरज असल्याचे प्रतिपादन बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे ज्येष्ठ संचालक ॲड. बाळासाहेब लामखडे यांनी व्यक्त केले आहे.**

निघोज येथे सहकारमहर्षी डी फार्मसी कॉलेज व महाविद्यालयांमध्ये राजश्री शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष आर.के. वराळ पाटील व ॲड. बाळासाहेब पवार यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संस्थेचे सचिव विराज वराळ पाटील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य कुलदिप वैद्य तसेच प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ॲड. लामखडे यावेळी म्हणाले राजश्री शाहू महाराज यांनी समतेचा संदेश दिला आहे मात्र आजचे राज्यकर्ते असोत की विविध पक्षाचे पुढारी जातीभेदाचे विष पेरीत असून यावर निवडणूकीचे राजकारण करीत आहेत ही सर्वाधिक दुर्दैवी बाब असून हा प्रकार महाराष्ट्राच्या संस्कृतीला हानीकारक असून छत्रपती शिवाजी महाराज यांनी सर्वांना बरोबर घेऊन स्वराज्याची स्थापना केली हा पुर्व इतिहास दुर्लक्ष करुण चालणार नाही. राजश्री शाहू महाराज यांची जयंती साजरी करताना विद्यार्थ्यांनी जातीभेद नष्ट करण्यासाठी शपथ घेण्याची गरज आहे तरच या महापुरूषांच्या जयंती साजरी करण्याचा आपला उद्देश सफल होणार आहे.

सहकार महर्षी किसनराव वराळ पाटील डी फार्मसी व बी फार्मसी महाविद्यालयाने आजपर्यंत चांगले काम करून निघोज व परिसराचा कायापालट केला असून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आर. के. वराळ पाटील व सचिव विराज वराळ पाटील यांचे शैक्षणिक कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. यावेळी आर.के. वराळ पाटील यांनी प्रास्ताविक भाषणात संस्थेची माहिती दिली.

**आंतरराष्ट्रीय मादक द्रव्य पदार्थ सेवन विरोधी दिवस निमित्ताने अंमली व मादक पदार्थ विरोधी भूमिका घेऊन विद्यार्थ्यांनी तस्करी करणाऱ्यांचा निषेध केला तसेच पुणे तसेच इतर ठिकाणी जे अमली पदार्थांची तस्करी व विक्री मोठ्या प्रमाणात होत असून यामुळे शैक्षणिक क्षेत्राला मोठा धोका निर्माण झाला आहे. निष्कारण शहरी विद्यार्थी यामध्ये बदनाम होत आहे यासाठी सरकारने या तस्करीला आळा घालण्यासाठी प्रयत्न करावेत तसेच शैक्षणिक क्षेत्र बदनाम करणाऱ्या गुन्हेगारांच्या विरोधात कडक कारवाई करण्याची मागणी केली.**

# वडगाव गुंडच्या लंके बंधूंचे राज्य सेवा परीक्षेत यश

**नगरपरिषदेत प्रशासन व करनिर्धारण अधिकारीपदी नियुक्ती**

वडगाव गुंड : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील वडगाव गुंड येथील शुभम भरत लंके व मंगेश सावळेराम लंके या दोघा बंधूंनी एम पी एस सी मार्फत घेतलेल्या राज्य सेवा परीक्षेत यश मिळवून नगरपरिषद प्रशासन व करनिर्धारण अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे दोघेही जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी आहेत.**

शुभमचे माध्यमिक शिक्षण विद्याधाम प्रशाला शिरूर येथे झाले आहे व इंजिनिअरचे शिक्षण पुणे येथे झाले आहे.तर मंगेशचे माध्यमिक शिक्षण शिक्षण मुलिकादेवी विद्यालय निघोज येथे झाले आहे.व बी एस सी चे शिक्षण राहुरी विद्यापीठात झाले आहे या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.शुभमचा दुसरा भाऊ आय आय टी कानपूर या ठिकाणाहून एम् डी एस् ही उच्च पदवी घेऊन मुंबई या ठिकाणी नामांकित कंपनीत नोकरी करत आहे.लंके परिवार या परिसरात शिक्षणात अग्रेसर असून या कुटुंबातील व नात्यातील अनेक व्यक्ती उपजिल्हाधिकारी , डॉक्टर, इंजिनिअर ,शिक्षक,व बँक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.





**आई वडील तसेच मित्र परिवार व नातेवाईक यांचे सातत्याने मिळणारे पाठबळ तसेच गुरुजनांचा आशिर्वाद व मार्गदर्शन यामुळे आम्ही लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन अधिकारी झाल्याचा आम्हाला आनंद आणी अभिमान आहे मात्र आपल्या जिल्ह्यातील जनतेसाठी काम करण्याची आमची संकल्पना असून ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या तालुक्यातील आपण असल्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.**

**शुभम भरत लंके व मंगेश सावळेराम लंके.**

शुभम याचे वडील भरत लंके हे जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक आहेत. तसेच मंगेश याचे वडील सावळेराम हे शेतकरी आहेत. शुभम व मंगेश यांनी उच्चशिक्षित होण्याचा निर्धार केला होता. अतिशय गुणवंत म्हणून त्यांचा जिल्हा परिषद शाळेत नावलौकिक होता. विविध स्तरांतून त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

# ब्लूमिंग बडस स्कुलमध्ये योगदिन उत्साहात

**प्राचार्य धनंजय नाईक यांचे मार्गदर्शन**



■ ब्लूमिंग इंग्लिश मिडियम स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये जागतिक योग दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

सुपा : प्रतिनिधी

**तालुक्यातील नारायणगव्हाण येथील समप्रभ शिक्षण संस्था संचलित ब्लूमिंग इंग्लिश मिडियम स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये जागतिक योग दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.**

यावेळी बोलताना प्राचार्य धनंजय नाईक यांनी सांगितले की, जगभराला योगाच्या फायद्याची जाणीव झाली असून योगामुळे मनुष्याचे शरीर निरोगी राहते. योगाची माहीती केवळ भारतीयांना होती. योगाचे मुळ किंवा योगातूनच भारतातील ऋषी मुनींच्या साधनेतून आकारास आला आहे. योग ही भारतीय भुमीतील विद्या आहे. आणि ही विद्या संपूर्ण विश्वाच्या कामी आली पाहिजे. योग हा जर मानवी जीवन सुखकर करण्यासाठी वेगवेगळया आजारांवर मात करण्यासाठी उपयोगी पडत असेल तर तो योग केवळ भारतापुरता न राहता भारताबाहेर संपूर्ण जगामध्ये त्याचा प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे अशी भूमिका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतली. त्यामुळेच जगभरामध्ये २१ जुन हा आंतराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात येत असल्याचे नाईक म्हणाले. योगासने व प्राणायाम याचे महत्वही प्राचार्य नाईक यांनी यावेळी विषद केले.

सुर्य नमस्कार, ताडासन, वृक्षासन, अर्धचक्रासन, कपालभाती, अनुलोम विलोम, ध्यानधारणा इत्यादींची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांना देण्यात आली.योगदिनाचे औचित्य साधून सतीशशेठ पोखरणा, ओंकार शेळके यांनी विद्यार्थ्यांना सुर्यनमस्काराचे प्रात्यक्षिक करून दाखविले.

जया शेळके, प्राचार्य धनंजय नाईक यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनामध्ये योगासनाचे काय महत्व आहे याची माहीती दिली. यावेळी सर्व शिक्षक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

# थकीत वेतनासाठी पारनेर साखर कारखाना कामगारांचा २० वर्षांपासून संघर्ष सुरूच

**क्रांती शुगर कंपनीकडून थकीत रक्कम देण्याची टाळाटाळ**

पारनेर: प्रतिनिधी

**पारनेर सहकारी साखर कारखान्याकडे, नियमित तसेच रजेचे वेतन,ग्रॅच्युइटीपोटी थकलेले साडेसात कोटी रुपये मिळावेत यासाठी तब्बल ५२५ कामगार गेल्या २० वर्षांपासून विविध पातळ्यांवर संघर्ष करीत आहेत.मात्र याबाबत अवसायनात निघालेला पारनेर साखर कारखाना विकत घेतलेली क्रांती शुगर कंपनी, साखर संचालक, साखर आयुक्त, अवसायक यांच्याकडून कामगारांची देणी देण्याबाबत टाळाटाळ होत असल्याने हतबल झालेल्या कामगारांनी संघटीत होत निकराचा लढा देण्याची तयारी सुरू केली आहे.क्रांती शुगर कंपनीने भंगारात विकलेली पारनेर कारखान्याची जुनी यंत्रसामुग्री कारखाना कार्यस्थळावरून हलवण्यास विरोध करण्याचा निर्णय कामगारांनी घेतला आहे.**

पारनेर कारखान्याकडे २० वर्षांपासून थकलेल्या रकमेच्या किमान दुप्पट,१५ कोटी रुपये मिळावेत अशी कामगारांची मागणी आहे.साखर कामगार युनियनचे उपाध्यक्ष निवृत्ती मतेयांच्यासह संघटनेचे पदाधिकारी वाय.जी.औटी,बाळासाहेब औटी, ज्ञानदेव जाधव,बाळासाहेब नऱ्हे,पोपट येवले यांनी ही माहिती दिली.सुमारे १९ कोटी रुपयांच्या थकीत कर्जाच्या वसुलीसाठी राज्य सहकारी बँकेने २०१७ साली पारनेर साखर कारखाना क्रांती शुगर कंपनीला विकला. कारखान्याची विक्री करताना कामगारांची देणी क्रांती शुगरने फेडण्याची तरतूद विक्री करारात करण्यात आली होती.विक्री प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मात्र क्रांती शुगरने कामगारांच्या देण्याबाबत हात वरती केले.गेल्या सात वर्षांपासून कामगार संघटना थकीत वेतनासाठी साखर संचालक, साखर आयुक्त, अवसायक यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहे.मात्र सगळ्याच पातळ्यांवर टोलवाटोलव सुरू असल्याने नेमकी दाद कोणाकडे मागायची याबाबत कामगारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. विक्री करारातील अटीनुसार कामगारांची थकीत देणी चुकती करावीत असे कारखान्याचे अवसायक राजेंद्र निकम यांनी क्रांती शुगर कंपनीच्या व्यवस्थापनाला दोन महिन्यांपूर्वी,२५ एप्रिल २०२४ रोजी कळवले.मात्र सदर कामगार कधीही आमचे कामगार नव्हते.त्यामुळे थकीत रक्कम देण्याची आमची जबाबदारी नसल्याचे क्रांती शुगरच्या व्यवस्थापनाने अवसायक निकम यांना कळवले आहे.

आम्ही पारनेर सहकारी साखर कारखान्याचे कामगार होतो.त्यामुळे आमची थकीत रक्कम मिळाल्याशिवाय आम्ही कारखान्याची जुनी यंत्रसामुग्री कारखाना कार्यस्थळावरून हलवू देणार नाही अशी भूमिका कामगार संघटनेने घेतली आहे.येत्या आठ दिवसांत कारखान्याच्या प्रवेशद्वारावर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू करण्याचा इशारा साखर कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.




**पारनेर सहकारी साखर कारखान्याने सन १९९९ ते २००४ या कालावधीतील अडीच वर्षांचे वेतन थकवले होते.अवसायनातील कारखान्याची राज्य सहकारी बँकेने क्रांती शुगर या कंपनीला विक्री केली.त्यानंतर २०१७ सालचा गळीत हंगाम सुरू करण्यापूर्वी कामगारांनी थकीत वेतनाची मागणी केली होती.क्रांती शुगरच्या व्यवस्थापनाने थकीत वेतन देण्याचे मान्य केले.त्यानंतर मात्र टाळाटाळ सुरू केली.कामगारांची थकीत रक्कम मिळाल्याशिवाय जुनी यंत्रसामुग्री हलवू देणार नाही.**

**निवृती मते,वाय.जी.औटी**
**साखर कामगार प्रतिनिधी.**

# शालेय जीवनात घेतलेले शिक्षण हाच स्पर्धा परीक्षांचा पाया

**पुरवठा निरीक्षक अधिकारी शुभम वाघमारे यांचे मत**

पारनेर : प्रतिनिधी

**शालेय जीवनातील शिक्षण हा विविध स्पर्धा परीक्षांचा पाया असल्याचे मत पुरवठा निरीक्षक शुभम वाघमारे यांनी व्यक्त केले.अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत घेण्यात आलेल्या आलेल्या परीक्षेतून पुरवठा निरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल वाघमारे यांचा पारनेर पब्लिक स्कूलच्या वतीने गौरव करण्यात आला.विद्यालयाचे प्राचार्य गीताराम म्हस्के यांनी वाघमारे यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के,पारनेर तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय वाघमारे उपस्थित होते.**

माध्यमिक शिक्षण घेत असताना विविध विषयांमधील संकल्पनांचे योग्य पध्दतीने आकलन झाले तर शालेय जीवनातील शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये त्याचा उपयोग होतो. त्याचबरोबर शालेय जीवनातील या अभ्यासाचा महाराष्ट्र लोकसेवा आयोग,केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षांबरोबरच विविध पदांसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठी, प्रवेश परीक्षांसाठी चांगला उपयोग होतो. त्यामुळे माध्यमिक शाळांचा अभ्यासक्रम हा स्पर्धा परीक्षांचा पाया असल्याचे वाघमारे म्हणाले.

केवळ स्पर्धा परीक्षाच नव्हे तर जीवनात कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल तर शालेय जीवनातील अभ्यसक्रमाशिवाय पर्याय नाही याची खूणगाठ मनाशी बांधून विद्यार्थ्यांनी गांभीर्याने अभ्यास करणे आवश्यक आहे. तुम्ही यशस्वी होत नाही तोपर्यंत सोशल मीडियाचा वापर टाळा. अभ्यासाशी निगडित आवश्यकता असेल तरच सोशल मिडियाचा जरूरी पुरताच मर्यादित वापर करा असा सल्ला वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना दिला.

प्राचार्य गीताराम म्हस्के म्हणाले की, केंद्रीय व राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षा खडतर असतात.या परीक्षेतून निवड होण्यासाठी विद्यार्थ्यांनी खडतर परिश्रम घेऊन जिद्दीने अभ्यास करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर पालकांनीही संयम ठेवणे आवश्यक आहे.समाजाने आणि पालकांनी अवास्तव अपेक्षांचे ओझे विद्यार्थ्यांवर टाकणे योग्य नाही.शुभमने जिद्दीने अभ्यास करून पुरवठा निरीक्षक पदाला गवसणी घातली आहे.कठोर परिश्रम घेऊन अभ्यास करण्याची शुभमची जिद्द पहाता तो निश्चितच आणखी वरिष्ठ पदांच्या परीक्षा उत्तीर्ण होईल असा विश्वास प्राचार्य म्हस्के यांनी व्यक्त केला.संजय वाघमारे यांचे भाषण झाले.दीपक जाधव यांनी सूत्रसंचालन केले.




### प्राचार्य गीताराम म्हस्के यांचे मार्गदर्शन

**उच्च माध्यमिक परीक्षा (१२ वी) उत्तीर्ण झाल्यावर पुढील शिक्षणासाठी पारनेर पब्लिक स्कूलचे प्राचार्य गीताराम म्हस्के यांचे मार्गदर्शन घेतले.त्यांनी स्पर्धा परीक्षांचा मार्ग निवडण्याचा सल्ला दिला. त्याचबरोबर एमपीएससी प्लॅनर या पुस्तकासह विविध अधिकाऱ्यांची प्रेरणादायी पुस्तके भेट दिली.स्पर्धा परीक्षांच्या क्लासेस विषयी मार्गदर्शन केले.त्यामुळे पुढील प्रवास सोपा झाला.**

**शुभम वाघमारे,** पुरवठा निरीक्षक.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com